## BOMBAY ACT No. XXXV OF 1959.

### THE BOMBAY BANDHIJAMA, UDHAD AND UGADIA TENURES ABOLITION ACT, 1959.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति तारीख २० मे १९५९ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो, याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.

## BOMBAY ACT No. XXXV OF 1959.

### AN ACT TO ABOLISH CERTAIN SPECIAL LAND TENURES PREVAILING IN THE KAIRA, BROACH, SURAT AND THANA DISTRICTS OF THE STATE OF BOMBAY.

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख २९ माहे मे सन १९५९ रोजीं प्रथम ( इंग्रजींत ) प्रसिद्ध केलेला.]

### मुंबई राज्याच्या खेडा, भडोच, सुरत व ठाणें या जिल्ह्यांत अंमलांत असलेले कांहीं विशेष भूसत्ताप्रकार नाहींसें करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्याच्या खेडा, सुरत व ठाणें या जिल्ह्यांतील विवक्षित गांवें, उधड बंधिजमा किंवा बंधिजमा किंवा जुडी या नांवानें ओळखण्यांत येणारी ठराविक व कायम स्वरुपाची आकारणी देण्यास पात्र आहेत आणि आकारणीसंबंधीं विशिष्ट मर्यादा प्रस्थापित करण्यांत व कायम ठेवण्यांत आल्याचा परिणाम म्हणून, उक्त गांवांतील जमीन धारण करणारांस, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ याच्या उपबंधांनुसार अशा जमिनीवर जमीन महसूल आकारण्याचा राज्य सरकारचा हक्क मर्यादित करणारा हक्क प्राप्त झाला आहे ;

आणि ज्याअर्थी, सुरत जिल्ह्यांतील विवक्षित जमिनी जमीन महसूल देण्यापासून अंशतः माफी देऊन उधड सत्ताप्रकारानें धारण करण्यांत आल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, भडोच जिल्ह्यांतील उगडिया जमिनी या नांवानें ओळखण्यांत येणाऱ्या कांहीं जमिनी, ठराविक व कायम स्वरुपाची आकारणी राज्य सरकारास देऊन धारण करण्यांत आल्या आहेत आणि आकारणीसंबंधीं विशिष्ट मर्यादा प्रस्थापित करण्यांत व कायम ठेवण्यांत आल्याचा परिणाम म्हणून अशा जमिनी धारण

करणारांस, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ याच्या उपबंधांनुसार अशा जमिनींवर जमीन महसूल आकारण्याचा राज्य सरकारचा हक्क मर्यादित करणारा हक्क प्राप्त झाला आहे ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें, ज्या सत्ताप्रकारानें उक्त गांवें व उधड आणि उगडिया जमिनी धारण करण्यांत आल्या आहेत तो सत्ताप्रकार नाहींसा करणें, त्या धारण करणारांचा उपरोक्त हक्क नष्ट करणें व त्यास आनुषंगिक असलेल्या गोष्टींसाठीं तरतुद करणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई बंधिजमा, उधड व उगडिया सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत अधिनियम, १९५९, असें म्हणावें.

(२) तो, मुंबई राज्याच्या खेडा, भडोच, सुरत व ठाणें या जिल्ह्यांना लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमांत,—

(१) "बंधिजमा सत्ताप्रकार" या संज्ञेचा अर्थ, ज्या सत्ताप्रकारानें बंधिजमा गांव किंवा त्यांतील जमीन धारण केली असेल तो सत्ताप्रकार, असा समजावा ;

(२) "बंधिजमा गांव" या संज्ञेचा अर्थ, उधड बंधिजमा, बंधिजमा, उधड जमाबंधि किंवा जुडी म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या ठराविक व कायम स्वरुपाच्या आकारणीस पात्र असलेलें अनुसूचि १ मध्यें निर्दिष्ट केलेलें गांव असा समजावा; अशी आकारणी, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांनुसार वाढविली जाण्यास पात्र असणार नाहीं ;

(३) "जमीन महसूल अधिनियम" या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, असा समजावा ;

(४) "उधड जमीन" या संज्ञेचा अर्थ, अनुसूचि २ मध्यें निर्दिष्ट केलेली जमीन असा समजावा ;

(५) "उधड सत्ताप्रकार" या संज्ञेचा अर्थ, ज्या सत्ताप्रकारानें, जमीन महसूल देण्यापासून अंशतः माफी देण्यांत आलेली उधड जमीन धारण केली असेल तो सत्ताप्रकार, असा समजावा ;

(६) "उगडिया जमीन" या संज्ञेचा अर्थ, उगडिया सत्ताप्रकारानें धारण केलेली जमीन, असा समजावा ;

(७) "उगडिया सत्ताप्रकार" या संज्ञेचा अर्थ, ज्या सत्ताप्रकारानें, राज्य सरकारास ठराविक व कायम स्वरुपाची आकारणी देऊन जमीन धारण करतां येते असा भडोच जिल्ह्याच्या कांहीं भागांत प्रचलित असलेला सत्ताप्रकार असा समजावा; परंतु अशी आकारणी, सत्ताप्रकारास ज्या शर्ती लागू असतील त्यांचा भंग केल्याचें खेरीजकरून इतर बाबतींत, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांनुसार वाढविली जाण्यास पात्र असणार नाहीं.

३. कोणताहि विधि, वहिवाट, रूढी, तडजोड, अधिकारपत्र, सनद किंवा आदेश, किंवा न्यायालयाचा कोणताहि हुकूमनामा किंवा आदेश यांत कांहींहि असलें तरी, हा अधिनियम ज्या तारखेस अंमलांत येईल त्या तारखेस व त्या तारखेपासून,—

बंधिजमा व उगडिया सत्ताप्रकार नाहीसें करणें व आनुषंगिक उपबंध.

(१) बंधिजमा सत्ताप्रकार, उधड सत्ताप्रकार व उगडिया सत्ताप्रकार नाहींसा करण्यांत आला आहे असें समजलें पाहिजे ;

(२) कोणत्याहि इसमाचा, राज्य सरकारास ठराविक व कायम स्वरुपाची आकारणी दिल्यावर बंधिजमा गांव किंवा त्यांतील जमीन धारण करण्यासंबंधींचा किंवा जमीन महसूल देण्यापासून अंशतः माफी दिलेली उधड जमीन धारण करण्या-संबंधींचा किंवा उगडिया जमीन धारण करण्यासंबंधींचा हक्क नष्ट करण्यांत आला आहे असें समजलें पाहिजे ;

(३) जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांनुसार बंधिजमा गांवाची किंवा त्यांतील कोणत्याहि जमिनीची किंवा उगडिया जमिनीची जमीन महसूलविषयक आकारणी करण्याचा राज्य सरकारचा हक्क मर्यादित करणारा अशा गांवाच्या किंवा त्यांतील जमिनीच्या संबंधांतील किंवा उगडिया जमिनीच्या संबंधांतील कोणत्याहि इसमाचा हक्क नष्ट करण्यांत आला आहे असें समजलें पाहिजे ; आणि

(४) बंधिजमा गांवांतील सर्व जमिनी व सर्व उधड जमिनी आणि सर्व उगडिया जमिनी, जमीन महसूल अधिनियम व तदन्वयें केलेले नियम यांच्या उपबंधांनुसार राज्य सरकारला जमीन महसूल देण्यास पात्र असतील, आणि बिनदुमाला जमिनीसंबंधींचे उक्त जमीन महसूल अधिनियमाचे व नियमांचे उपबंध अशा जमिनीस लागू होतील.

## अनुसूचि १.

[ कलम २, पोट-कलम (२) पहा. ]

बंधिजमा गांवें.

| गांवाचें नांव. | तालुका. | जिल्हा. |
|---|---|---|
| १. धारोडा ... ... ... | मातर ... | खेडा. |
| २. मारकुंडा ... ... ... | कापडवंज ... | खेडा. |
| ३. कवीलपूर ... ... ... | नवसारी ... | सुरत. |
| ४. विशालपूर ... ... ... | नवसारी ... | सुरत. |
| ५. जमालपूर ... ... ... | नवसारी ... | सुरत. |
| ६. वीरवाडी ... ... ... | नवसारी ... | सुरत. |
| ७. वेलेगांव ... ... ... | पालघर ... | ठाणें. |

# अनुसूचि २.

[कलम २, पोट-कलम (४) पहा.]

उघड जमीन.

| जिल्हा. | तालुका. | गांव. | जमीन. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | भूमापन क्रमांक. | क्षेत्रफळ. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | |
| | | | | ए. | गुं. |
| सुरत ... | ... चिखली | ... ओंड ... | २६४ | ० | ५ |
| | | | २६६ | ० | ९ |
| | | | २७४ | ० | १५ |
| | | | २९४ | १ | २९ |
| | | | २९५ | १ | ३ |
| | | | २९६ | ३ | ३४ |
| | | | २९७ | ० | १८ |
| | | | २९८ | ० | २४ |
| | | | २९९ | ० | १७ |
| | | | ३०८ | २ | २ |
| | | | ३०९ | १ | १२ |
| | | | ३१० | ० | १५ |
| | | | ३११ | ० | २३ |
| | | | ३१२ | ० | २६ |
| | | | ३१३ | ० | १३ |
| | | | ३१४ | ० | ५ |
| | | | ३१५ | १ | ८ |
| | | | ३१६ | ० | १३ |
| | | | ३१७ | ० | ३९ |
| | | | ३१८ | ० | १५ |
| | | | ३१९ | १ | ११ |
| | | | ३२३ | ० | १ |
| | | | ३२४ | ० | २३ |
| | | | ३२५ | ० | २२ |
| | | | ३२६ | ० | ४ |
| | | | ३२७ | ० | २० |
| | | | ३२८ | २ | ६ |
| | | | ३२९ | ० | ५ |
| | | | ३३० | २ | ९ |
| | | | ३३१ | ० | २७ |
| | | | ३३२ | ० | १७ |
| | | | ३३३ | ० | २८ |
| | | | ३३४ | ० | १६ |
| | | | ३३६ | १ | १५ |
| | | | ३३८ब | ० | १७ |

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.